# गरुड झेप

www.janatabankpune.com

सन २०१५ - अंक २ रा (जनता सहकारी बँक लि., पुणे द्वारा प्रकाशित गृहपत्रिका : केवळ खाजगी वितरणासाठी)


## अध्यक्षांचे लेखणीतून,



आपली बँक सहकारी बँक आहे. सहकाराची तत्वे आपल्या सर्वांच्या नसानसात भिनलेली आहेत. ज्या विचार धारेशी आपण निगडीत आहोत ती संघभावना आहे. म्हणजे कोणी एक जण नाही. आपण सर्वजण, असा तो विचार आहे. शाखाव्यवस्थापकांच्या परिषदेमध्ये शाखाव्यवस्थापकांच्या जबाबदाऱ्या व त्यांच्याकडून अपेक्षा याबाबत उहापोह झाला आहे. शाखा म्हणजे कोणी एक फक्त शाखाव्यवस्थापक नव्हे. शाखा म्हणजे त्यात सर्वजण येतात, सेवक, ग्राहक, ठेवीदार, कर्जदार, भागधारक, हितचिंतक व या सर्वांना आधार देणारे हेड ऑफिस कडील विविध विभाग या सर्वांचा त्यात समावेश होतो. शाखेबाबत शाखाव्यवस्थापकांइतकेच शाखेतील इतर सेवकांचेही उत्तरदायित्व आहे. सेवकांची जबाबदारी ही कोणत्याही प्रकारे कमी होत नाही. खातेदारांनी पैसे भरले वा काढले, त्याच्या नोंदी केल्या, हिशोब जमवला म्हणजे आपली जबाबदारी संपली असे सेवकाने समजू नये. आपण बँकेमध्ये फक्त ठेवी स्वीकारणे व कर्जे देणे एवढ्याच प्रकारचा व्यवसाय करीत नाही. पूर्वीच्या प्रमाणे ठराविक साच्याचा कर्जव्यवहार व ठेवींच्या योजना हे दिवस केव्हाच मागे पडले. सतत "नवे ते हवे" हा असा प्रकार जीवनाच्या सर्वच क्षेत्रात सुरू झाला आहे. उदा. शिक्षण पद्धतीत बदल झाला, पेहरावात बदल झाला, खाद्य सवयींमध्ये वैविध्य आले. प्रवासाची साधने आधुनिक झाली व प्रवास वाढला. अशा एक ना अनेक उदाहरणातून एक गोष्ट प्रकर्षाने निदर्शनास येते ती म्हणजे करावयाचे काम अधिक सोपे, आरामदायी, आनंददायी कसे होईल याकडे ही, मार्गक्रमण चालू आहे. बँकांमध्ये कॉम्प्युटर्स बसले. सेवा जलद व बिनचूक देणे हे उद्दिष्ट त्यात आहे. त्याबरोबरच क्लिष्ट आकडेमोडींचे काम संगणकाकडे गेले. पण ग्राहकाला सुहास्यवदनाने सेवा देणे, मधुर बोलणे, त्याच्या अडचणी समजावून घेणे, अपेक्षा समजून घेणे व त्याप्रमाणे कार्यवाही करणे या बाबी संगणक वा यंत्रे करू शकत नाहीत. ती जबाबदारी आपलीच आहे हे प्रत्येक सेवकाने लक्षात घ्यावे.

➤ पान क्र. ३ वर

# औरंगाबाद येथे बँकेचे

## पहिले ऑफसाईट एटीएम व ई-गॅलरीचा शुभारंभ



**बँकेच्या पहिल्या ऑफसाईट एटीएमचे उद्घाटन करताना डावीकडून मा. श्री. अरविंद खळदकर, मा. श्री. अनिल भालेराव, मा. श्री. हरिभाऊ बागडे, मा. श्री. वसंतराव कुलकर्णी**

आपल्या औरंगाबाद शाखेचे पहिले ऑफसाईट एटीएम व ई-गॅलरी ३ जानेवारी २०१५ रोजी डॉ. हेडगेवार रुग्णालय कॅम्पस मध्ये सुरू झाली. या गॅलरीच्या कार्यक्रमाचे उद्घाटन विधान सभेचे अध्यक्ष मा.ना.हरिभाऊजी बागडे यांचे हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. हेडगेवार रुग्णालयाचे अध्यक्ष श्री. अनिल भालेराव व कार्यवाह श्री. अनंत पंढरे यांची उपस्थिती होती.

बँकेच्या या ई-गॅलरी मध्ये अद्यावत एटीएम व मेगाबँकर यंत्रणा बसविण्यात आली आहे. या सुविधेमुळे रुग्णालयातील कर्मचारी व परिसरातील नागरिकांना, खातेदारांना पैसे काढणे, भरणे, पासबुक भरणे इ. ची सोय २४ तास उपलब्ध राहणार आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी मा. श्री. वसंत कुलकर्णी यांनी केले. तर बँकेचे कार्याध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर व शाखेचे संपर्क संचालक मा. जगदीश कदम यांनी प्रमुख पाहुण्यांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत केले.

कार्यक्रमासाठी परिसरातील बँकेचे खातेदार, नागरिक, हितचिंतक, रुग्णालयातील कर्मचारी तसेच स्थानिक नगरसेवक श्री. सुरेंद्र कुलकर्णी हे उपस्थित होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जेष्ठ प्रचारक कै. दत्ताजी भाले यांचा स्मृतीदिन त्याच दिवशी असल्यामुळे त्याचे औचित्य साधून त्यांच्या प्रतिमेला मा. हरिभाऊ बागडे यांनी पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर उद्घाटन व पाहुण्यांचे सत्कार करण्यात आले.

या ई-गॅलरीच्या उभारणीमध्ये सहभागी झालेल्या व्यक्तींचा सत्कार संचालक मा.श्री. विजय भावे साहेब मा. श्री. विरू खोमणे, मा. श्री. लक्ष्मण पवार, मा. सौ. मधुरा कसबेकर

पान क्र. ६ वर

# रूपकुंड

## एक अविस्मरणीय हिमालय ट्रेक

> सुमारे ५ तासानंतर १४५०० फुटावरील भागवासा या ठिकाणी पोचलो. मात्र पूर्ण बर्फातून चालावे लागल्याने खुपच दमछाक झाली होती. मात्र एक वेगळाच अनुभव मिळाला. या ठिकाणी तापमान झीरो डीग्री होते. १४५०० फुटावर जशी जशी चढाई सुरू झाली तसतसे निसर्गाची विविध रूपे फार विलोभनीय व अविस्मरणीय अनुभवाला येत असतात.

पुण्यातील आमच्या गिर्यारोहक मित्रांसह Trek the Himalayas या संस्थेमार्फत उत्तराखंडामधील रूपकुंड ट्रेक यशस्वीरित्या पूर्ण केला. A Himayalan Mystery Lake Trek होता. या ट्रेकला पौराणिक पार्श्वभूमी असून कैलास पर्वतावर जाणाऱ्या मार्गावर १५६६७ फुटावर रूपकुंड हे कुंड आहे. माता पार्वती ही एका युद्धात विजयी होऊन कैलास पर्वतावर जाण्यासाठी निघाली असता तहानेने व्याकुळ होऊन पाण्यासाठी शंकराकडे धावा केल्यानंतर शंकरांनी त्रिशूळांनी एक विवर तयार केले ज्यामध्ये पाणी निर्माण होऊन पार्वतीनी तहान भागवली होती. सदर कुंड हे वर्षातील काही दिवस वगळता बाराही महिने बर्फाच्छादीत असते.

दर १२ वर्षांनी या ठिकाणी यात्रा भरते. फार प्राचीन काळी एका यात्रेच्या वेळी हिमवर्षाव होऊन अनेक लोक या ठिकाणी मृत झाले. आजही त्यांचे सांगाडे रूपकुंड येथे आढळतात. दोन वर्षांपूर्वी डेक्कन कॉलेज, पुणे येथील एका संशोधकाने रूपकुंड परिसरात शोध घेता त्यांना काही पूर्ण मानवी सांगाडे, कोल्हापूरी चपला आढळल्या व काही चित्पावन लोक हिम वादळात मृत झाले असा निष्कर्ष काढला होता. अतिशय खडतर असा हा ट्रेक गणला जातो.



आम्ही उत्तराखंड मधिल लोहाजंग (उंची सुमारे ९००० फुट) या गावापासून ट्रेकला सुरूवात केली. पहिल्या दिवशी दिडना या गावापर्यंत सुमारे ५ ते ६ कि.मी. अंतर पार करून पोहोचलो. अतिशय निसर्गरम्य असा परिसर होता. सुरूवातीला उतार व नंतर निलगंगा नदी पार करून चढाई करावी लागली. सुमारे ५ तासानंतर दिडना या गावी पोहोचलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी ७.३० वा. अली बुग्याल या ठिकाणी जाणेसाठी ट्रेकला सुरूवात झाली. या दिवशी साधारणपणे ५ ते ६ कि.मी. अंतर असा सुरूवातीला जंगलातून मग चढाई असा प्रवास झाला. (उंची ११००० फुट).

तिसऱ्या दिवशी अली ब्यूगाल ते घोडा लोटणी असा ५ कि.मी. प्रवास झाला. पण या प्रवासात बऱ्याच ठिकाणी बर्फातून चालावे लागले व शेवटच्या टप्प्यात हिम वर्षाव झाला. अतिशय दाट धुके व हिम वर्षाव यामुळे घोडा लोटणी येथे पोहोचताना थोडा त्रास झाला. या ठिकाणापर्यंतच खेचरे/घोडे येतात व पुढील प्रवास जनावरे करू शकत नाहीत म्हणून या ठिकाणाला घोडा लोटणी (घोडा परत जाणे) असे नाव पडले आहे. (येथून पुढे ट्रेक बहुतांशी बर्फातूनच करावा लागत असल्याने घोडा/खेचर जाऊ शकत नाही.) या रात्री सतत हिम वर्षाव झाला होता. पहाटे उठल्यावर सर्वदूर बर्फच बर्फ होते. बर्फाची पांढरी चादर जणू अंथरली असे दृश्य होते. हा एक अविस्मरणीय अनुभव होता. (उंची १२००० फुट)

चौथ्या दिवशी आता खडतर टप्पे पार करावयाचे होते. कारण बहुतांशी चालणे बर्फातून होते. आता १४५०० फुटापर्यंत चढाई बर्फातून होती. सकाळी ७.०० वा. चढाईस सुरूवात केली. आता भागवासा या कॅम्पपर्यंत जायचे होते. सुमारे ५ तासानंतर हे अंतर ५ कि.मी. चालणे झाले. १४५०० फुटावरील भागवासा या ठिकाणी पोचलो. मात्र पूर्ण बर्फातून चालावे लागल्याने खूपच दमछाक झाली होती. मात्र एक वेगळाच अनुभव मिळाला. या ठिकाणी तापमान झीरो डीग्री होते. १४५०० फुटावर जशी जशी चढाई सुरू झाली तसतसे निसर्गाची विविध रूपे फार विलोभनीय व अविस्मरणीय अनुभवाला येत असतात.

पाचव्या दिवशी भल्या पहाटे उठून प्रत्यक्ष रूपकुंड चा टप्पा होता. हे अंतर अतिशय खडतर आहे. कारण जाता येता सुमारे ५ कि. मी. अंतर आहे. चढाई सुमारे १००० फुटाची पूर्ण बर्फातून व तीव्र चढाईचा मार्ग आहे. सुमारे १५६६७ फुटावर रूपकुंड आहे. आमची टीम पहाटे ५.०० वा. चढाई करून सकाळी १०.३० वा. भागवासा येथे परत आलो व पुन्हा परतीच्या प्रवासाला सुरूवात केली. अली बुग्याल येथून मात्र परतीचा प्रवास लोहाजंग ऐवजी वान या गावी पूर्ण केला. या शेवटच्या दिवशी १५ कि. मी. अंतर पार केले. साधारणपणे एकूण ट्रेकमध्ये सुमारे ६० कि.मी. अंतर पार केले. अतिशय निसर्गरम्य वातावरणात प्रसंगी जंगलातून, बर्फातून असा हा ट्रेक पूर्ण यशस्वीरित्या पूर्ण झाला.

यापूर्वी हिमालयात ३ ट्रेक केले आहेत व हा रुपकुंड चा सलग चौथा ट्रेक पूर्ण केला. हिमालयातील भावणारा निसर्ग, बर्फाच्छादित शिखरे, थंड हवामान यामुळे ट्रेकची आवड निर्माण झाली आहे. शारीरिक क्षमतेचाही कस लागतो. आमचा पुण्यातील १४ व्यक्तिंचा ग्रुपही तयार झाल्याने साधारणपणे दरवर्षी ट्रेक करणेची मनिषा आहे. दर रविवारी सिंहगड येथे जात असल्याने बहुदा हिमालयातील ट्रेक सोपे जातात असा माझा अनुभव आहे.

– **राजेंद्र वि. वर्तक** (ऑडीट विभाग)

# जुन्नर शाखेमध्ये पिग्मी ठेव योजनेचा प्रारंभ

''सेवेत काळानुरुप आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या बँकेच्या सकारात्मक गुणांच्या बळावरच जनता सहकारी बँकेची यशस्वी वाटचाल सुरू आहे'' असे प्रतिपादन श्रीकृष्ण जोगळेकर यांनी केले.

जुन्नर शाखेच्या पिग्मी ठेव योजनेव्या प्रारंभी श्रीकृष्ण जोगळेकर बोलत होते. यावेळी बँकेचे ज्येष्ठ सभासद जुन्नर तालुका भाजप माजी अध्यक्ष डॉ. गंभीरमल कर्नावट, माजी नगराध्यक्ष नटवरलाल मुथा, डॉ सुनीता ढोबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जोगळेकर म्हणाले, केवळ सहकारातूनच व्यक्तिचा विकास शक्य आहे, या तत्त्वावर श्रद्धा ठेवून सहकारी चळवळीपासून मिळणारे फायदे आणि सवलती जुन्नर तालुक्यातील जनतेला मिळाव्यात या हेतूने कार्यरत असलेल्या बँकेच्या यशस्वी वाटचालीत संचालक, सभासद, कर्जदार, हितचिंतक, अधिकारी, कर्मचारी यांचा सिंहाचा वाटा आहे.

यावेळी शाखा व्यवस्थापक दिनेश सव्वाशेर, विधी सल्लागार ॲड. अनिरुद्ध जोगळेकर, उल्हास शहा, अजित गांधी, उत्तम सदाकाळ आदी मान्यवर उपस्थित होते तसेच सहाय्यक शाखा व्यवस्थापक मनोद टेंबे, मार्केटिंग प्रतिनिधी रविंद्र भगत, सुनील भाटे, बिहारीलाल परदेशी, सतीश खरे, अनिल डुंबरे, अंकुश भरम, स्मिता पांडे, आस्था केदारी, नितीन नांगरे, दिलीप पवार यांची उपस्थिती होती.

➤ पान क्र. १ वरून

## अध्यक्षांचे लेखणीतून

आपण स्वत: जेथे कोठे ग्राहक म्हणून जातो तेथे जर अपेक्षित सेवा मिळाली नाही तर आपण तेथे पुन्हा जाण्याचे नक्कीच टाळतो. तदवतच बँकेचाही ग्राहक आता असाच विचार करतो. त्यास नानाविध पर्याय उपलब्ध होत आहेत. केवळ सोने, जमीन, बँक ठेवी अशी मर्यादीत गुंतवणुकीची माध्यमे आता राहिलेली नाहीत. देशांतर्गत उत्पादन वाढले, क्रयशक्ति वाढली तशीच गुंतवणूक करण्याची क्षमता पण वाढली अशा वेळी ग्राहकांना वाढत्या सामाजिक व आर्थिक अनिश्चिततेमध्ये भविष्याची चिंता वाटू लागते अशा वेळी बँका हे एक अत्यंत सुरक्षित असे गुंतवणुकीचे माध्यम असा अनेकांचा विश्वास असतो. याचा जास्तीत जास्त फायदा घेणे व आपल्या ठेवी वाढविणे हे प्रत्येक शाखेने निश्चितपणे करणे आवश्यक आहे. आपल्या प्रयत्नांना हार्दिक शुभेच्छा!

## सिंहगड रोड शाखेने सुप्रसिद्ध संगीतकार अवधूत गुप्ते यांचा 'नवल वर्तले' पुस्तक भेट देऊन केला गौरव



बँकेच्या सिंहगड रोड, पुणे शाखेतील खातेदार श्री. आनंद क. गुप्ते व त्यांचे चिरंजीव सुप्रसिद्ध संगीतकार श्री. अवधूत आनंद गुप्ते यांनी नुकतीच शाखेस भेट दिली. या प्रसंगी शाखेतर्फे मा. चेअरमन श्री. खळदकर साहेब यांनी लिहिलेले 'नवल वर्तले' हे पुस्तक भेट म्हणून देण्यात आले. या पुस्तकाबद्दल श्री. आनंद गुप्ते यांनी लेखी अभिप्राय पाठवला. त्यात ते म्हणाले, "पुण्याच्या जनता सहकारी बँकेच्या ऐतिहासिक यशोगाथेची दुसरी गोष्ट म्हणजे 'नवल वर्तले' ही कहाणी हाती आली आणि हातोहात वाचून संपवली. पुस्तक मनापासून आवडलं. खरं कारण म्हणजे त्यात सच्चाई ठासून भरलीय. जे आलं, जे भोगलं तसं तस्संच लिहिलं आणि बस्स! पुस्तकात रंगीत, साधे फोटो आहेत तसंच परिशिष्टात सर्व संचालक मंडळां विषयी नामावली दिली आहेत. लिखाणा पलिकडं वाचकाची कुतुहलं ती पुरी करतात."

### माहे डिसेंबर २०१४ व जानेवारी-फेब्रुवारी २०१५ मध्ये निवृत्त झालेले सेवक

| | | |
|---|---|---|
| श्री. अनिल वि. पवार | सेंट्रलाईज्ड सेल | सहाय्यक महाव्यवस्थापक |
| श्री. विजय स. देवधर | कर्ज विभाग | वरिष्ठ अधिकारी |
| श्री. गंगाधर य. जोशी | सीआयसीडी | कनिष्ठ अधिकारी |
| श्री. पराग म. गानू | ऑडिट इन्स्पे. | कनिष्ठ अधिकारी |
| श्री. प्रदीप र. जोशी | सीआयसीडी | कनिष्ठ अधिकारी |
| श्री. केशव गो. जेस्ते | चिंचवड स्टेशन | कनिष्ठ अधिकारी |
| श्री. वसंत गुरुलिंग स्वामी | CICD विभाग | कनिष्ठ अधिकारी |
| श्री. शशिकांत शं. पुराणिक | कॅश सेल चिंचवड | लेखनिक |
| श्री. विजय बा. दिक्षीत | भोर | लेखनिक |
| श्री. कांचन कृष्णा शेवडे | कर्वेरोड | लेखनिक |
| श्री. दत्तात्रय बा. दिवाण | अंबाजोगाई | लेखनिक |
| श्री. राजन र. कुलकर्णी | शिपाई | बाजीराव रोड शाखा |

पुढील आयुष्यात आपल्याला उदंड सौख्य व निरामय दीर्घायुष्य लाभो!!

## भवानी पेठ पुणे शाखेने आयोजित केला 'स्नेहमेळावा'

शाखेचे सभासद खातेदार यांच्याशी संवाद व हितगुज करण्याच्या दृष्टीने भवानी पेठ शाखेने खातेदारांसाठी स्नेह मेळाव्याचे आयोजन केले होते. स्नेह मेळाव्याचे उद्घाटन शाखेचे संपर्क संचालक मा. श्री. लक्ष्मण अंबुसा पवारसाहेब यांनी केले. याप्रसंगी शाखेचे गार्डियन एक्झीक्युटीव्ह व बँकेचे उपमहाव्यवस्थापक मा. श्री. धनंजय मधुकर देशपांडे, शाखाव्यवस्थापक श्री. गिरीधर दौ. खैरनार व शाखेचा सर्व सेवक वर्ग तसेच बँकेचा खातेदार वर्ग उपस्थित होता.

शाखेतील खातेदार सभासदांना अगदी मोकळेपणाने बँकेचे संचालक मा. श्री. लक्ष्मण अंबुसा पवार साहेब व उपमहाव्यवस्थापक मा. श्री. धनंजय मधुकर देशपांडे साहेब यांच्याशी संवाद करता यावा ; ग्राहक म्हणून सूचना व अपेक्षा प्रत्यक्षपणे सांगता याव्यात म्हणूनच या स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी खातेदारांना तिळगुळ वाटप ही करण्यात आले. साधारणत: १५० हून अधिक खातेदारांनी या स्नेह मेळाव्यासाठी उपस्थिती लावली. अनेक खातेदारांनी सदर उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने खातेदारांना अनेक सूचना केल्या व त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न श्री. देशपांडे साहेबांनी केला.

## चिंचवड शाखेमध्ये ग्राहक भेट कार्यक्रम उत्साहात संपन्न

आपल्या चिंचवड शाखेमध्ये ग्राहक भेट हा कार्यक्रम दि. १२/०२/२०१५ रोजी आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महिंद्र व्हेईकल्स मॅन्युफॅक्चरींग लि. चे जनरल मॅनेजर (एच आर) श्री. महेश करंदीकर, सिनिअर मॅनेजर श्री. उदयसिंग खरात, युनियनचे अध्यक्ष श्री. सागर भोसले हे उपस्थित होते. त्यांचे हस्ते कंपनीतील कर्मचाऱ्यांना कर्जाच्या पे-स्लीप देण्यात आल्या तसेच मा. संचालक श्री. किशोरभाई शहा, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंतराव कुलकर्णी, मा. सह.महाव्यवस्थापक श्री. डी.जी. कुलकर्णी, मा. विभाग प्रमुख मार्केटिंग श्री. वेलिंग हे उपस्थित होते या सर्वांच्या हस्ते एकेक कर्जाच्या पे स्लीप सुपूर्त करण्यात आल्या. यावेळी खातेदारांनी आपल्या अडचणी सांगितल्या व काही मौलिक सूचनाही केल्या.

# रिझर्व्ह बँकेची महत्त्वाची परिपत्रके

**१) परिपत्रक क्र. ३३७/२०१४-१५**
**दि. ०४/१२/२०१४**

**विषय- मोबाईल बँकिंग विषयी प्रसार व कामकाजाच्या मार्गदर्शक सूचना**

रिझर्व्ह बँकेने श्री. सांबमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली एका टेक्निकल समितीची स्थापना केली होती. सदर समितीने मोबाईल बँकिंग विषयी बँकांचे ग्राहक, बँका त्याच प्रमाणे बँकांचे स्टेक होल्डर्स यांचेकडून आलेल्या सूचना, अडचणी यांचा अभ्यास करून, मोबाईल बँकिंगचा प्रसार व त्याचा वापर याविषयी उपयुक्त सूचना केल्या आहेत. बँकांनी या सूचनांचा योग्य वापर करून, मोबाईल बँकिंगच्या अधिक प्रभावी प्रसारासाठी योगदान देणे आवश्यक आहे.

१) बँकांनी त्यांचे स्वत:चे इंटरनेट वापरावे.

२) एमपीआयएन मेलर्स चा वापर करावा.

३) बँकांची कॉमन वेबसाईट चा वापर करावा.

४) बँकांनी त्यांच्या सद्य ग्राहकांबरोबर त्यांना अवगत भाषेतून संपर्क करावा व मोबाईल बँकिंगचे महत्व समजावून सांगावे.

५) ग्राहकाचे खाते उघडताना त्याच्या ओपनिंग फॉर्मवर मोबाईल बँकिंगच्या रजिस्ट्रेशनची विनंती छापावी.

६) ग्राहकाचे खाते उघडताना मोबाईल बँकिंगची सुविधा व तीचे महत्व ग्राहकाला विस्तृत समजावून सांगावे.

७) बँकेच्या सद्य ग्राहकांना एसएमएस, ई मेलच्या माध्यमातून मोबाईल बँकिंगची माहिती द्यावी.

८) एटीएम, इंटरनेट, सोशल मिडीया, फोन बँकिंग, बँकेची वेबसाईट इ. माध्यमातून मोबाईल बँकिंग विषयी माहिती ग्राहकाला द्यावी. ग्राहकाचा मोबाईल क्रमांक बँकेजवळ नसल्यास, जेथे जेथे ग्राहकाचा संपर्क होतो, तेथून त्याचा मोबाईल नंबर घेऊन सदर योजनेची माहिती ग्राहकास उपलब्ध करावी.

**२) परिपत्रक क्र. ३३८/२०१४-१५**
**दि. ०५/१२/२०१४**

**विषय- व्हाईट लेबल एटीएम यांना मार्गदर्शक सूचना**

भारतीय रिझर्व्ह बँकेने बँकांना त्यांचे ग्राहकांसाठी एटीएम ची सुविधा उपलब्ध करून देण्यास परवानगी दिलेली आहे. त्याचप्रमाणे **दि. २२/०६/२०१२** रोजी रिझर्व्ह बँकेने इंडियन कंपनी ॲक्ट १९५६ अंतर्गत स्थापन झालेल्या खाजगी नॉन बँकिंग कंपन्यांना देखील त्यांच्या ग्राहकांसाठी एटीएम ची सुविधा वापरण्यास मान्यता दिली आहे. खाजगी कंपन्यांसाठी लागू एटीएम सेवेस व्हाईट लेबल एटीएम सेवा असे म्हणतात. सदर कंपन्यांना आता भारतीय रिझर्व्ह बँकेने वाढीव सुविधा त्यांच्या ग्राहकांना उपलब्ध करून देण्यासाठी मान्यता दिली आहे.

१) व्हाईट लेबल एटीएम कंपन्यांना आता आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्ड व डेबिट कार्ड तसेच प्रीपेड कार्ड चा वापर करण्यास परवानगी दिली आहे. या सुविधा वापरण्यापूर्वी या कंपन्यांना कार्ड नेटवर्क ऑपरेटरकडून टेक्निकल कनेक्टीव्हीटी प्रस्थापित करून घ्यावी लागेल.

२) आंतरराष्ट्रीय कार्डच्या वापरासाठी या कंपन्यांना डायनामिक करन्सी कन्व्हर्जन सुविधा त्यांचे डब्ल्यूएलए वर वापरण्यास परवानगी देण्यात आली आहे. करन्सी कन्व्हर्जनचा दर त्यांना ॲथॉराईज्ड डीलरकडून प्राप्त करावा लागेल. व्हाईट लेबल एटीएम ना आंतरराष्ट्रीय कार्ड धारकांना करन्सी कन्व्हर्ट करताना त्यांच्या होम करन्सी साठी बेस एक्सचेंज रेटचा वापर करावा लागेल.

३) स्पॉन्सर बँकेकडून रोकड पुरवठा खंडीत करण्यास परवानगी देण्यात आली आहे. रोकडची मालकी व्हाईट लेबल एटीएम ची असेल तर एटीएम मधील रोकडची गुणवत्ता स्पॉन्सरिंग बँकेची जबाबदारी असेल.

४) ज्या व्हाईट लेबल एटीएमना, पीएसएस ॲक्ट २००५ अंतर्गत मान्यता देण्यात आलेली आहे त्यांनी वरील सेवा त्यांचे ग्राहकास देण्यापूर्वी रिझर्व्ह बँकेस अवगत करावे.

**३) परिपत्रक क्र. ३४९/२०१४-१५**
**दि.१२/१२/२०१४**

**विषय- बचत खात्यात किमान बाकी न राखल्याबद्दल लावलेल्या दंडाविषयी**

दि. २२/१०/२०१४ रोजी परिपत्रक काढून भारतीय रिझर्व्ह बँकेने बचत खात्यात लावलेल्या व्याजदराची तसेच इतर सेवा खर्चाची विस्तृत सूची ग्राहकांच्या माहितीसाठी बँकेच्या हॉलमध्ये लावण्यास सूचित केले होते.

रिझर्व्ह बँकेच्या डेव्हलपमेंटल आणि रेग्युलेटरी पॉलिसीनुसार व दामोदरन शिफारशीनुसार बँकांनी त्यांचे ग्राहकाने बचत खात्यात किमान बाकी न राखल्यास रोख दंड आकारण्याऐवजी बचत खात्यात ग्राहकाला उपलब्ध सेवा कमी कराव्यात, अशी सूचना रिझर्व्ह बँकेने केली आहे. खात्यात पुरेशी रक्कम ग्राहकाने जमा केल्यास या सेवा पुन: प्रस्थापित केल्या जाव्यात. ग्राहकाला दंड करण्यापूर्वी सदर प्रस्ताव एसएमएस, ई-मेल, पत्राद्वारे ग्राहकास कळवावा व खाते नियमित करण्यासाठी त्याला पुरेसा अवधी देण्यात यावा. रोख दंड आकारण्यापूर्वी खालील प्रक्रिया पूर्ण कराव्यात.

१. रोख दंड आकारण्यापूर्वी बँकांनी ग्राहकांना त्या विषयी एसएमएस, ई मेल, पत्राद्वारे कळवावे. ग्राहकाला खाते नियमित करण्यासाठी एक महिन्याचा अवधी द्यावा.

२. खात्यात आकारलेल्या दंडाच्या रक्कमेविषयी ग्राहकाला पत्र लिहून कळवावे.

३. बँकेच्या दंड आकारण्याच्या या प्रक्रियेस संचालक मंडळाची परवानगी असणे आवश्यक आहे.

४. आकारलेला रोख दंड खात्यातील शॉर्टफॉलशी निगडीत असावा.

५. आकारलेला रोख दंड बँकिंग मधील तत्कालीन पद्धतीशी सुसंगत असावा.

६. दंड आकारल्यानंतर खात्यात ओव्हरड्राफ्ट होता कामा नये.

**४) परिपत्रक क्र. ३५२/२०१४-१४**
**दि. १५/१२/२०१४**

**विषय- आरटीजीएससाठी बँकांच्या कामकाजाच्या वेळात वाढ**

आरटीजीएस च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने ऑक्टोबर २०१३ मध्ये अनेक उपयुक्त बदल केले. ग्राहक तसेच बँकांअंतर्गत मोठ्या रक्कमांचे आरटीजीएस व्यवहार त्यांचा नफावृद्धी तसेच त्यांच्या तरलतेच्या व्यवस्थापनासाठी मोठ्या प्रमाणावर होतो आहे. अनेक बँका आणि त्यांच्या ग्राहकांचे खास विनंती वरून आरटीजीएसच्या वेळापत्रकात वाढ करण्यात येत आहे. यापुढे आरटीजीएस चा व्यवहार सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.०० ऐवजी ८.०० वा. सुरू होईल व संध्याकाळी ८.३० वा. बंद होईल. शनिवारी सकाळी ८.०० वा. सुरू होईल व दुपारी ३.३० वा. बंद होईल.

**५) परिपत्रक क्र. ३५९/२०१४-१५**
**दि. १७/१२/२०१४**

**विषय- युनायटेड नेशन्स सेक्युरिटी कॉन्सिल यांनी जाहीर केलेली अल कायदा ची अद्ययावत यादी**

युनायटेड नेशन्स सेक्युरिटी कॉन्सिल ने जाहीर केलेली अलकायदा सँक्शन्सची अद्यावत यादी भारतीय रिझर्व्ह बँकेने समितीच्या वेबसाईटवर प्रसिद्ध केली आहे.

सदर परिपत्रकात जाहीर केलेल्या नावाचे अथवा संस्थांचे खाते अस्तित्वात असेल अथवा उघडत असाल तर भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार त्याविषयी आवश्यक ती कारवाई बँकांनी करावी.

**६) परिपत्रक क्र. ३७३/२०१४-१५**
**दि. ३१/१२/२०१४**

**विषय-२००५ पूर्वीच्या ओल्ड सिरीज नोटांवरील बंदी**

भारतीय रिझर्व्ह बँकेने दि. ३/०३/२०१४ रोजी परिपत्रक काढून २००५ पूर्वीच्या जुन्या सिरीजच्या चलनी नोटा बंद केल्या आहेत. या नोटांच्या एक्सचेंजसाठी रिझर्व्ह बँकेने दि. ३०/०६/२०१५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

सर्व बँकांना विनंती की त्यांनी त्यांच्या शाखांना सदर चलनी नोटा ग्राहकांना बदलून द्याव्यात व त्यामुळे ग्राहकांना कसलीही असुविधा होणार नाही, याकडे विशेषत्वाने लक्ष द्यावे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने या नोटा एटीएम मध्ये तसेच व्यवहारात येऊ नयेत म्हणून करावयाच्या उपाययोजना बँकांना सुचविलेल्या आहेत. त्याचे बँकांनी पालन करावे.

# अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर यांची 'रुपी' च्या सल्लागार मंडळात नियुक्ती



मा. श्री. अरविंद खळदकर



मा. श्री. सुधीर पंडित

पुणे :- 'रुपी' सहकारी बँकेचे प्रशासक डॉ. संजयकुमार भोसले यांना सहाय्य करण्यासाठी बँकिंग क्षेत्रातील तीन तज्ज्ञ व्यक्तिंचे सल्लागार मंडळ नेमण्याचे आदेश सहकार आयुक्त चंद्रकांत दळवी यांनी काढले आहेत. आपल्या बँकेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर, संचालक व सुप्रसिद्ध चार्टर्ड अकौंटंट व आपल्या बँकेचे संचालक मा. श्री. सुधीर पंडित, नॅशनल फेडरेशन फॉर को. ऑप. अर्बन बँकेचे (नॅफकब) अध्यक्ष डॉ. मुकुंद अभ्यंकर यांची सल्लागार मंडळात नियुक्ती करण्यात आली आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने रुपी बँकेवर आर्थिक निर्बंध घातल्यानंतर सहकार विभागाने त्यावर द्विसदसीय प्रशासक मंडळ नेमले होते. त्याच्या अध्यक्षपदी डॉ. संजय भोसले व सदस्य म्हणून बँकिंग तज्ज्ञ विद्याधर अनास्कर यांची नियुक्ती करण्यात आली होती. दरम्यानच्या काळात अनास्कर यांनी सदस्यपदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर डॉ. भोसले हेच 'रुपी' चे काम पहात होते.

सहकार आयुक्तांनी आता प्रशासकांना सहाय्य करण्यासाठी या तिघा तज्ज्ञ व्यक्तिंची नियुक्ती केली आहे.

पुढील काही महिन्यात या बँकेचे विलीनीकरण करण्यासाठी सर्वच क्षेत्रातून मागणी होत आहे, त्यावर सल्लागार मंडळ निर्णय व पाठपूरावा करणार आहे.

## शिवाजीनगर - पुणे शाखेचा सामाजिक बांधिलकी जपणारा स्तुत्य उपक्रम : 'मासिक प्रबोधन वर्ग'

शिवाजीनगर पुणे शाखेतर्फे राष्ट्रपती पारितोषिक विजेता श्री. प्रणव जयवंत दिवेकर याचा सत्कार करण्यात आला. या प्रश्नांनी शाखेचे मासिक प्रबोधन वर्गाचे निमित्ताने याप्रसंगी प्रणव व त्याचे आईवडील यांना बँकेत निमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमास बँकेचे संपर्क संचालक मा. श्री. बिरु खोमणे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुरुवातीला शाखाव्यवस्थापक श्री. अतुल क्षीरसागर यांनी श्री. प्रणव दिवेकर याचा सविस्तर परिचय करून दिला. अपंग व्यक्तिंसाठी उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल प्रणव यास जागतिक अपंगदिनानिमित्त नुकताच मा. राष्ट्रपती श्री. प्रणवकुमार मुखर्जी यांच्या हस्ते दिल्लीमधील विज्ञानभवन येथे 'मानसिक अपंग' या गटातील 'आदर्श व्यक्तिमत्व' हा राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आला.

'डाऊन सिंड्रोम'मुळे प्रणव शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या कमकुवत होता. कोणत्याही व्याधीवर मात करण्याची पहिली पायरी म्हणजे तिचा मनाने स्वीकार करणे. प्रणवच्या डाऊन सिंड्रोमचा त्याच्या घरच्यांनी स्वीकार केला आणि त्यावर मात करण्यासाठी अथक परिश्रम केले. जिद्दीने तो दहावीची परीक्षा पास झाला. पालकांनी त्याला कला आणि क्रीडा या दोन्ही क्षेत्राची दारे खुली करून दिली होती. कलाक्षेत्रात तबला, पेटी, चित्रकला आणि पाककलेत प्रणवने प्रावीण्य मिळविले. पाककलेमधील तंत्रशुद्ध शिक्षण घेतले आणि बेकरी-केटरिंगचा अभ्यासही पूर्ण केला. याच वेळी तो आंतरराष्ट्रीय जलतरणपटू झाला. अमेरिकेत २०१२ मध्ये झालेल्या विशेष ऑलिम्पिकमध्ये आणि ऑस्ट्रेलियामध्ये झालेल्या एशिया पॅसिफिक स्पर्धेत त्याने पदके मिळविली. प्रणवच्या या कार्याचा गौरव करण्यासाठी त्याची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. राष्ट्रपतींनी त्याला आदर्श व्यक्तिमत्व या राष्ट्रीय पुरस्काराने गौरविले.

प्रणव याने आजपर्यंत अमेरिकेमध्ये २०१२ मध्ये झालेल्या विशेष ऑलम्पिक मध्ये व ऑस्ट्रेलियामध्ये झालेल्या एशिया पॅसिफिक स्पर्धेत पदके प्राप्त केलेली आहेत.

प्रणव हा शाखेचा खातेदार असून एटीएम कार्डचा वापर चांगल्या पद्धतीने करतो. त्याने राष्ट्रपतींनी दिलेला धनादेशसुद्धा आपल्या बँकेमार्फत वटविला. एकंदरीत प्रणवकडे पाहून सेवकांमध्ये एक नवीन उत्साह निर्माण झाला व अशा समाजघटकांबाबत मनात आपुलकी निर्माण झाली.

## तळेगांव शाखेचे स्थानिक सल्लागार डॉ. दिलीप भोगे यांची डॉक्टर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी निवड

तळेगांव दाभाडे - मावळ डॉक्टर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी आपल्या तळेगांव दाभाडे शाखेचे स्थानिक सल्लागार डॉ. दिलीप भोगे यांची निवड झाली. ४ जानेवारीला झालेल्या या बैठकीस १५० डॉक्टर्स उपस्थित होते. अध्यक्ष डॉ. शशिकांत पवार यांच्याकडून त्यांनी सूत्रे स्वीकारली. मावळच्या वैद्यकीय सुविधा वाढवून गरीब रुग्णांना जास्त फायदा कसा होईल यासाठी झटण्याचा मनोदय डॉ. भोगे यांनी व्यक्त केला.

डॉ. भोगे तळेगाव मेडिकल कॉलेजात प्राध्यापक व विभागप्रमुख, तळेगाव जनरल हॉस्पिटलचे मानद सचिव, कृष्णराव भेगडे इंग्लिश स्कूलचे अध्यक्ष व आय.एम.ए. महाराष्ट्रच्या जेरिॲट्रिक कमिटीचे अध्यक्ष आहेत. या बैठकीत सचिवपदी डॉ. अजय ढाकेफळकर व खजिनदारपदी डॉ. अमित कुलकर्णी यांची निवड झाली. आपल्या बँकेतर्फे या नवनियुक्तांचे हार्दिक अभिनंदन!

## शाखा वर्धापनदिनाच्या शुभेच्छा !



| | |
|---|---|
| सिंहगड रोड(पुणे स्टॉक एक्सचेंज) पुणे | ५ मार्च |
| पौड रोड | २१ मार्च |
| खेडब्रह्मा शाखा, गुजरात | २९ मार्च |



## Knowledge page

आपल्याला कोणी shut up म्हणाले तर केवढा अपमान वाटेल ! पण हा शब्द oh shut up असा अक्षर समुहा ने वापरला गेला तर फार वेगळाच अर्थ होतो. तुम्ही तुमच्या मित्राला एखादी असम्भव वाटणारी पण खरी आणि धक्का दायक अशी बातमी दिली आणि हां मित्र उत्तम इंग्रजी manners पाळणारा असेल तर तो म्हणेल oh shut up याचा अध्यारुत अर्थ I just can't believe it ! म्हणजे मराठीत आपण म्हणतो ना गप रे काहीही काय सांगतोस ! तेव्हा आता कोणी shut up म्हणाले तरी off होऊ नका !

**– अभय शरद बापट**

# माखजन शाखेत ''सुकुमार बचत ठेव खाते'' अभियान यशस्वी



आपल्या माखजन शाखेतर्फे दि. ६ फेब्रुवारी २०१५ रोजी माखजन परिसरातील 'माखजन इंग्लिश स्कूल' माखजन (सरंद) येथे 'सुकुमार बचत ठेव खाते' अभियान घेण्यात आले. या कार्यक्रमात शाखा व्यवस्थापक श्री. श्रीनिवास गरवारे यांनी विद्यार्थ्यांना अभियानाचे महत्व विषद केले. बँकेची माहिती, बचतीचे महत्त्व, बँकेकडून मिळणाऱ्या सुविधा तसेच एटीएम कार्ड याबद्दल सांगितले. विद्यार्थ्यांना बचतीची सवय लागावी या हेतूने ही योजना राबवली जात असल्याचे शाखा व्यवस्थापक श्रीनिवास गरवारे यांनी सांगितले.

सुकुमार बचत ठेव योजनेमुळे १० वर्षावरील मुलांना प्रत्यक्षात बँकेचे व्यवहार करता येणार आहेत.

याप्रसंगी माखजन शाखा व्यवस्थापक श्रीनिवास गरवारे, सहाय्यक शाखा व्यवस्थापक ज्योतिबा पाटील, अनंत शिगवण, अपूर्वा साठे, माखजन इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक राजेंद्र केळकर, संतोष कुलकर्णी, हर्षदा कदम, अमोल पाटील आदी उपस्थित होते.

# फोर्ट शाखेचे एटीएमचे उद्घाटन व नूतनीकृत जागेत स्थलांतर



आपल्या फोर्ट, मुंबई शाखेचे अत्याधुनिक व प्रशस्त जागेत स्थलांतर झाले. उद्घाटन, 'जन्मभुमी' वृत्तपत्राचे संपादक श्री. कुंदनजी व्यास व बँकेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंदराव खळदकर यांचे हस्ते झाले तत्पूर्वी एटीएम सेवेचे उद्घाटन बँकेचे संचालक मा. श्री. अतुलजी बेडेकर यांचे हस्ते संपन्न झाले या वेळी शाखेत श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन केले होते.

कार्यक्रमाची सुरूवात सन्माननीय पाहुण्यांचे हस्ते दीप प्रज्वलनाने झाले. यावेळी शाखाव्यवस्थापक श्री. विवेक शिरोडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. तसेच श्री. कुंदनजी व्यास यांचा पत्रकारीते मधील सर्वोत्कृष्ट टिळक पुरस्कार मिळाले बद्दल व श्री. वसंतराव बेडेकर यांचा भोसला मिलिटरी स्कूल, नासिक या संस्थेचे अध्यक्षपदी निवड झाले बद्दल तसेच सौराष्ट्र ट्रस्टचे प्रशासकीय अधिकारी श्री रॉनी इराणी यांचा बँकेचे वतीने अध्यक्ष श्री. खळदकर यांचे हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करणेत आला.

या प्रसंगी बोलताना श्री. कुंदन व्यास यांनी बँकेचे कौतुक करून भारतीय संस्कृतीची जाण ठेऊन केलेले उद्घाटन असे प्रशंसोद्गार व्यक्त केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच श्री. रॉनी इराणी यांनीही शुभेच्छा देऊन बँकेला सर्व प्रकारचे सहकार्य करणेचे आश्वासन दिले. त्यानंतर कार्यक्रमाचा समारोप बँकेचे अध्यक्ष श्री. खळदकर साहेब यांनी केला. आभार शाखेतील अधिकारी श्री. सुरेश मुळे यांनी मानले.

कार्यक्रमास बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंत कुलकर्णी, सह-महाव्यवस्थापक श्री. दिलीप कुलकर्णी व श्री. अभय बापट, मार्केटिंग विभाग प्रमुख श्री. लिमये मुंबईतील सर्व शाखांचे शाखाव्यवस्थापक व सेवकवर्ग, सभासद, खातेदार, ठेवीदार, स्थानिक सल्लागार समिती सदस्य, बँकेचे माजी संचालक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुंबई शहर विभाग संघचालक, विभाग कार्यवाह, प्रचारक व अन्य अधिकारी तसेच बँकेचे सेवक प्रतिनिधी श्री. मधुसूदन हर्डीकर व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## श्री रघुनाथ सखाराम महाडिक यांना ''कोकण उद्योगरत्न'' पुरस्कार प्रदान

वडाळा : मुंबई येथील यशस्वी उद्योजक व ''मे. सुनिल बाईंडिंग ॲन्ड प्रिंटिंग वर्क्स''चे मालक श्री. रघुनाथ सखाराम महाडिक हे १९७६ पासून दादर शाखेचे खातेदार आहेत. कोकणातील गरीब शेतकरी कुटुंबातील, श्री. महाडिक यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत आपल्या प्रिंटिंग व्यवसायाची सुरूवात केली. गेली ४० वर्ष त्यांनी प्रचंड मेहनत घेऊन व्यवसायाचा मोठा विस्तार केला आहे. त्यांची व्यवसायाच्या प्रति असलेली निष्ठा, आत्मीयता, प्रामाणीकपणा, वक्तशीरपणा, चिकाटी या गुणांमुळे करीत ''प्रतिथयश उद्योजक'' असा नावलौकिक मिळविला आहे.

त्यांनी २००४ साली गिरणी कामगारांना आर्थिक मदत व आधार मिळवून देण्यासाठी मित्रांच्या सहकार्याने वडाळा येथे साईसिद्धी नागरी सहकारी पतपेढीची स्थापना केली. व्यवसायाच्या व्यापातून उसंत काढून ते पोयनार या मुळगावी नेहमी मदत करीत असतात.

श्री. रघुनाथ सखाराम महाडिक यांना महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा, दापोली यांनी आयोजित केलेल्या २३व्या मराठी साहित्य संमेलनात ''कोकण उद्योगरत्न'' हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. श्री रघुनाथ महाडिक यांच्या सारखे कष्टाळू उद्योजक आपल्या बँकेचे खातेदार आहेत याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो.

पान क्र. १ वरून

## औरंगाबाद शाखेचे पहिले ऑफसाईट एटीएम व ई-गॅलरीचा शुभारंभ

यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन करण्यात आला.

बँकचे कार्याध्यक्ष मा. श्री.अरविंद खळदकर व संपर्क संचालक मा.श्री. जगदीश कदम यांनी बँकेची कामगिरी व बँकेच्या आगामी विस्तार योजनांची माहिती उपस्थितांना दिली.

प्रमुख अतिथी मा. अनिलजी भालेराव व डॉ. अनंत पंढरे यांनी डॉ. हेडगेवार रुग्णालयाच्या वाटचालीमध्ये जनता बँक देत असलेल्या योगदान बद्दल कृतज्ञता व्यक्त करून बँकेशी असलेले ऋणानुबंध अधिक दृढ झाले आहेत व होतील याची ग्वाही दिली.

अध्यक्षिय भाषणामध्ये मा.श्री.हरिभाऊ बागडे यांनी आपल्या जीवनामध्ये जनता बँकेने केलेल्या मदतीचा पुनरुच्चार करून बँकेच्या कार्याबद्दल प्रशंसोद्गार काढून आपल्या भावना व्यक्त केल्या व बँकेच्या वाटचालीस शुभेच्या दिल्या .

शाखा व्यवस्थापक श्री. धनंजय सहस्त्रबुद्धे यांनी सर्वांचे आभार मानले.

# कोल्हापूर शाखेमध्ये शिक्षक मेळावा संपन्न




**कार्यक्रमासाठी उपस्थित डाविकडून उपमहाव्यवस्थापक मा. श्री. आपटे, कोल्हापूर जिल्हा अधिक्षक मा. मोरे, मा. श्री. काकतकर व श्री. विनय दुनाखे**

कोल्हापूर शाखेने नुकताच शिक्षकांचा मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात मा. मुख्याध्यापक व कर्मचारी यांना आमंत्रित केले होते. कार्यक्रमासाठी कोल्हापूर जिल्हा अधीक्षक मा. श्री. शंकरराव मोरे, अधिक्षक (वेतन व भविष्य निर्वाहनिधी-माध्यमिक) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच मुख्य कचेरीकडून सहमहाव्यवस्थापक मा. श्री. काकतकर साहेब व उपमहाव्यवस्थापक मा. श्री. आपटे साहेब उपस्थित होते. आपल्या शाखेत पगार जमा होणाऱ्या ७२ शाळांना व नव्याने येऊ घातलेल्या ५ शाळांना कार्यक्रमासाठी आमंत्रित केले होते. या शाळांमधील सुमारे १५० ते १६० शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजनाने झाली. शाखेतील अधिकारी श्री. चंद्रकांत माने यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. त्यानंतर मा. काकतकर साहेबांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार झाला. शाखाव्यवस्थापक श्री. दुनाखे यांनी मा. काकतकर साहेब व मा. आपटे साहेब यांचे स्वागत केले. शाखाव्यवस्थापक श्री. दुनाखे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व त्यानंतर मा. आपटे साहेब यांनी बँकेची सद्यस्थिती, बँक देत असलेल्या सुविधा याबाबत पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन केले.

नंतर प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम झाला. यामध्ये शिक्षकांनी काही सूचना दिल्या, व अपेक्षा व्यक्त केल्या आणि बँकेवरील प्रेम व्यक्त केले. त्यांच्या शंकांचे मा. काकतकर साहेब यांनी निरसन केले.

## कोकण विभागात स्नेहसंमेलन संपन्न

आपल्या बँकेच्या पुणे स्टाफ वेलफेअर असोसिएशन कोकण विभाग यांचे स्नेह संमेलन जानेवारी मध्ये रत्नागिरी येथे संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात असोसिएशन चे अध्यक्ष मा. श्री. पराग ठाकूर, कोकण विभाग प्रतिनिधी श्री. किशोर पावसकर आपल्या बँकेचे कला क्रीडा मंडळ प्रमुख श्री. खाडिलकर, सेवक संचालक श्री. हर्डीकर, बँकेचे तज्ज्ञ संचालक मा. श्री. भावे साहेब व बँकेचे डेप्यु. जनरल मॅनेजर, श्री. आपटे साहेब व असोसिएशन चे अन्य पदाधिकारी यांनी दीप प्रज्वलनाने केली.

विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम साजरे झाले. कार्यक्रमाची सुरुवात श्रीप्रसाद खांडेकर यांच्या 'विनायका हो सिद्ध गणेशा' गीताने झाली. शेला पागोटे, तबला वादन, कथाकथन, कविता वाचन असे अनेक कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यानंतर खास महिलांसाठी 'अंताक्षरी' हा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये महिलांनी उत्साहाने सहभाग घेतला.

गेली अनेक वर्षे कोकण विभागाचे स्नेह संमेलन उत्साहात पार पडते याबद्दल श्री. पराग ठाकूर यांनी सर्वांचे कौतुक केले. कोकणच्या स्नेह संमेलनातून दरवर्षी नव्याने आम्हांला काही शिकायला मिळते असे उद्गार व्यासपीठावरील मान्यवरांनी काढले.

यावर्षी कोकण विभागाने स्पर्धांची खंडीत पडलेली परंपरा नव्याने चालू करून कॅरम, बॅडमिंटन, व टेबल टेनिस स्पर्धा घेतल्या यामध्ये कोंकण विभागातील सर्व शाखातील सेवक उत्साहाने सहभागी झाले होते आणि वैशिष्ट्याची बाब म्हणजे प्रत्येक शाखेतील एका सेवकाला कोणत्या ना कोणत्या स्पर्धेत नैपुण्य मिळालेले आहे. पुढील वर्षी या स्पर्धा मोठ्या प्रमाणावर घेण्याचा मानस आहे. साधारणपणे दीड दिवसांचा हा कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला. मुंबई विभाग, पुणे विभाग, मराठवाडा विभागातून अनेक सेवक उत्साहाने स्नेह संमेलनात सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू जोशी व श्रीप्रसाद दांडेकर यांनी केले.

## तळेगांव येथील 'साप्ताहिक अंबर' च्या बातमीत आपल्या बँकेचा गौरवपूर्ण उल्लेख

तळेगांव येथील 'साप्ताहिक अंबर' या जुन्या साप्ताहिकात तळेगांव मध्ये होत असलेल्या आर्थिक गुंतवणुकीबाबत आलेल्या बातमीत गेल्या ५० वर्षात झालेल्या उलाढालीबाबत आपल्या बँकेचा आवर्जून उल्लेख झाला आहे. आपल्या बँकेच्या योगदानाबद्दल घेतली गेलेली दखल ही प्रेरणादायी आहे. दि. १८ जानेवारीच्या अंकात 'तळेगांव बनतेय देशातील महत्वाचे आर्थिक केंद्र' या बातमीमध्ये 'तळेगांव शहरात जनता सहकारी बँक आणि पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकांनी आपापल्या शाखांमार्फत आर्थिक व्यवहारास सुमारे ५० वर्षांपूर्वी सुरुवात केली. जनता बँकेने व्यापारी आणि मध्यमवर्गीयांना बचतीची आणि आर्थिक कर्जपुरवठ्याची सुविधा दिली. यामुळे गेल्या ५०-६० वर्षात तळेगाव शहर आर्थिकदृष्ट्या अतिशय संपन्न शहर म्हणून उदयास येत आहे.' अशा शब्दात आपल्या बँकेचे कौतुक केले आहे, याचा आपणांस निश्चितच आनंद व अभिमान आहे. व्यक्तिच्या, संस्थेच्या प्रगतीमध्येच देशाची प्रगती होत असते हे खरेच आहे!

# Cyber Crime



In the previous issue we discussed about some of the Cyber Crimes. In this issue we will discuss about other types of Cyber Crimes.

**Denial of Service Attack :-**

In cyber world a Denial of service (DOS) attack is an attempt to make machine or network resource unavailable to its intended users. Denial of Service attack is also known as Distributed Denial of Service (DDoS) attack. DOS / DDoS attack involve flooding a computer with more requests than it can handel. This causes the computer or server to get crashed and results in non availability of service for temporary or indefinite period.

**Virus / Worm Attacks :-**

Viruses are small software programs that are designed to spread from one computer to another and leaving infections as it travels. Almost all types of viruses are attached to an executable files. A virus might corrupt or delete existing files or data available on the computer. Viruses are mostly spread by attachments in e-mail messages, downloads through internet. They can be hidden in illegal software or programs or files.

Worms are similar to viruses but they are self replicating. Worm enters into a computer through a vulnerability in the system and takes advantage of file transport or information transport features on the system allowing it to travel unaided.

**Trojans and Keyloggers :-**

A Trojan is another type of malware named after the wooden horse the Greeks used to infiltrate Troy. Users are typically tricked into loading executing it on their computer system. After it's activation it can achieve any number of attacks on computer system. Trojans are also known to create back doors to give malicious / illegal users access to system. Trojans do not get self replicated. Trojans mostly spread by downloads through internet, attachments to e-mail messages.

Keylogger is a type of surveillance software that has the capability to record every keystroke you make on keyboard. Keyloggers are most commonly found in public computers such as those in cyber cafes, hotels etc. Keyloggers are normally used by culprits to steal login details, passwords, credit card / debit card information.

**Internet Time Theft :-**

Internet time theft comes under the heading of hacking. It is the use by an unauthorized person of the internet hours paid for by another person. The person who gets access to some one else's ISP user ID and password, either by hacking or by gaining access to it by illegal means, uses it to access the Internet without the other person's knowledge. You can identify time theft if your Internet time has to be recharged often, despite infrequent usage.

**Web Jacking :-**

This term is derived from the term hi jacking. In these kinds of offences the hacker gains access and control over the web site of another. The motive is usually the same as hijacking ransom. This occurs when someone forcefully takes control of a website by cracking the password and after changing it. The owner of the website does not have control anymore over what appears on that website. Web jacking is a surprisingly easy way to take control of a Web site. While Web site owners fortify their systems with firewalls and other security measures, some have lost control of their sites as a result of a web jacker simply emailing the registrar. Unless the door that allows web jacking to occur is closed and locked, no amount of front-facing security will protect Web sites from such a rear attack.

**E-mail Frauds :-**

Email fraud is the intentional deception made for personal gain or to damage another individual through email. It began to be used as a means to defraud people. In the email frauds most of the scam emails promise the receiver millions or sometime billions of dollars. Most commonly the email says that some rich African bureaucrat or businessman or politicians has died and left behind a lot of money. The victims is informed that a small amount of money ranging from 100 to 2500 dollars are needed for bank charges or other paper work. This money is the motive behind the elaborate scam. Once the victim pays this money the scamster disappears from the scene. A majority of these emails have originated from Israel, Netherlands, UK and other European countries. These scam emails are believed to originate from Nigeria.

**Cyber Terrorism :-**

Cyber terrorism is the premeditated use of disruptive activities, or the threat thereof, in cyber space, with the intention to further social, ideological, religious, political or similar objectives, or to intimidate any person in furtherance of such objectives.

**Use of encryption by terrorists :-**

Encryption technology has always been regarded as a weapon, due to its uses in wars and espionage. Trend that is emerging nowadays is the increasing use of encryption. Usually the proponents of regulations claim that terrorists and cybercrime are heavy users of strong cryptography. Strong encryption is the criminal's best friend and the policeman's worst enemy. Terrorists have a new tool - a mobile encryption software system that operates cell phone-to-cell phone, and works on even those devices that aren't equipped with the technology. Called the "Mobile Encryption Program," the software is intended for mobile phones that run off Android and Symbian systems — but it allows for the encrypted files to be sent and read on phones with different systems.

**Ashish Naware** – IT Department

# अंबाजोगाई शाखेच्या नवीन इमारतीचे शानदार उद्घाटन



फोटो लाईन

दि. ०२/०२/२०१५ रोजी आपल्या अंबाजोगाई शाखेच्या नवीन इमारतीचे ए.टी.एम. सुविधेसह शानदार उद्घाटन होऊन तेथे शाखेचे नियमित कामकाज सुरू झाले. वास्तू उद्घाटनासाठी अंबाजोगाई नगरीचे उप नगराध्यक्ष मा. श्री. राजकिशोर मोदी तर ए.टी.एम. चे उद्घाटनासाठी लातूरचे प्रसिद्ध डाळ उत्पादक व व्यापारी श्री. हुकुमशेठ कलंत्री आले होते व मा. श्री. खळदकरसाो, श्री.लेलेसाो, श्री. मुलालिकसाो, श्री. शहासाो, श्री. विजय भावेसाो, श्री. धनंजय देशपांडे उपस्थित होते.

नवीन वास्तूत शाखा सुरू करण्यापूर्वी वास्तुशांत करून घेतली. शाखेतील ज्येष्ठ सेवक श्री. सुधीर कुलकर्णी यांनी सपत्नीक पूजा केली तर सत्यनारायणाची पूजा शाखेचे शाखाव्यवस्थापक श्री. सतीश पाटील यांनी सपत्नीक पूजा केली. दोन्ही उद्घाटनाची फीत कापून झाल्यानंतर उद्घाटन समारोह पांडुरंग कार्यालयात ग्राहकांच्या प्रचंड प्रतिसादात व उत्साहात पार पडला. कार्यक्रमास ग्राहकांची उपस्थिती उल्लेखनीय होती. उद्घाटन सोहळ्यात उपनगराध्यक्ष श्री. मोदी यांनी बँकेचे भरभरून कौतुक केले. त्यांनी आवर्जून सांगितले की, बँकेने त्यांचे उमेदीच्या काळात रु. २५,०००/- कर्ज देऊन त्यांचे व्यवसायास हातभार लावला. त्याच शिदोरीवर आज त्यांची भरभराट झाल्याचे त्यांनी विनयाने कबूल केले. बँकेचे माजी संचालक श्री. कलंत्री यांनी देखील त्यांचे व्यवसायात बँकेच्या अर्थ सहाय्याचा मोठा हातभार असल्याचे आवर्जून सांगितले. जनता बँकेचा पैसा व्यवसायास हातभार लावतो हे मान्य करतानाच जनता बँक ही छोट्या लोकांची मोठी बँक आहे हे देखील विश्वासाने सांगितले. सर्व उपस्थितांनी समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, शाखेतील सेवक श्री. मकरंद कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रदर्शन शाखा व्यवस्थापक श्री. सतीश पाटील यांनी केले.

# तळेगाव स्टेशन शाखेमध्ये ग्राहक भेट मेळावा संपन्न

९ फेब्रुवारी २०१५ रोजी आपल्या बँकेच्या तळेगाव स्टेशन शाखेमध्ये ग्राहक भेट मेळावा संपन्न झाला. आपली बँक ही नेहमीच ग्राहकाच्या सेवेबाबत अत्यंत जागरुक आहे म्हणूनच बँकेचे संपर्क संचालक मा. किशोरभाई शहा, संचालक मा. रामदास शिंदे, मुख्य कचेरीचे उपमहाव्यवस्थापक मा. रविंद्र देवचक्के यांच्या उपस्थितीत ग्राहक भेट मेळावा आयोजित केला होता.

या मेळाव्यास माजी आमदार कृष्णराव भेगडे, तळेगावातील प्रसिद्ध उद्योगपती श्री. किरण काकडे, सागर पवार, अजय दाभाडे, डॉ. परीपत्यदार, प्रसिद्ध उद्योजक मा.पी.एन.के. नायर, शांताराम काजळे, तळेगाव येथील दुर्गामाता पतसंस्था, मामासाहेब खांडगे पतसंस्था सरसेनापती दाभाडे पतसंस्था पै. नारायण काळोखे पतसंस्था, विश्वनाथ भेगडे पतसंस्था, विघ्नहर पतसंस्था, या नामांकित पतसंस्थांचे अध्यक्ष, संचालक जिल्हा संघचालक मा. सुरेशभाई शहा, वडगांव येथील जय गणेश सेवा संस्थेचे श्री. संजय व्हसाळे, विविध महिला बचत गटाच्या प्रमुख, हिंद विजय पतसंस्थेचे मा. रविंद्र दाभाडे असे अनेक मान्यवर उपस्थित राहिले. यावेळी हिंद विजय पतसंस्थेला संचालक मा. किशोरभाई शहा, संचालक मा. रामदास शिंदे, मुख्य कचेरीचे उपमहाव्यवस्थापक मा. रविंद्र देवचके, शाखाव्यवस्थापक श्री. महेश काळे यांनी संयुक्त भेट दिली.

डॉ. भोगे यांची डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. याच कार्यक्रमाबरोबर बँकेच्या सेवकांबरोबर संवाद साधून ''ग्राहक देवो भव:'' हे सूत्र कामात सतत ठेवावे असे मार्गदर्शन मा. किशोरभाई शहा यांनी केले. अत्यंत उच्च दर्जाच्या आधुनिक सेवा देण्यात बँक अग्रणी आहे. टेक्नोबेस सर्विसेसमुळे ग्राहकांना सेवा देताना सुसंवाद राहतोच असे नाही, त्यासाठी तसेच सेवेत अप ग्रेडेशन हा हेतू ठेवून ग्राहक भेट मेळावा होता. त्यात बँकेच्या ग्राहकांनी आवर्जून सहभाग घेतला.

## अभिनंदन!

आपल्या बँकेतील C.I.C.D. विभागातील सेवक श्री. गंगाधर चिं. दामले यांचे चिरंजीव चि. विराज गंगाधर दामले हे अमेरिकेत Nano. इंजिनिअरिंग विषयात स्कॉलरशिप मिळवून पी.एच. डी. करीत आहेत. त्यांनी या विषयामध्ये एक पेपर लिहीला असून, हा पेपर नुकताच अमेरिकेत पब्लिश झाला. त्याचे शीर्षक "Insensitive" to Touch: Fabric-Supported Lubricant-Swollen Ploymeric Films for Omniphobic Personal Protective Gear असून त्याचे त्याबद्दल कौतुक होत आहे. चि. विराज चे याबद्दल हार्दिक अभिनंदन!

# ग्राहकांच्या सोयीसाठी औरंगाबाद शाखेचा गॅस वितरण केंद्रावरच अकाऊंट ओपनिंग कार्यक्रमास प्रारंभ

सध्या सरकारतर्फे एल.पी.जी. गॅसची सबसिडी ग्राहकांच्या खात्यात थेट जमा केली जात आहे. यासाठी बँकेत खाते असणे शासनाने अनिवार्य केले आहे. याठी बँकेत खाते असणे शासनाने अनिवार्य केले आहे परंतु ग्राहकांना बँकेत खाते उघडण्यासाठी अनेक अडचणी येत आहेत, हे जाणून घेऊन आपल्या औरंगाबाद शाखेने गॅस वितरण केंद्रावर ग्राहकांना खाते उघडण्यासाठी बँकेच्या सुविधेस प्रारंभ केला.

सरकारने ग्राहकांना सिलेंडर सबसिडीचा लाभ मिळण्यासाठी बँकेत खाते असणे अनिवार्य केल्यामुळे व त्या संदर्भातील अनेक अडचणींमुळे ग्राहकांची कोंडी होत असल्याचे लक्षात असल्यामुळे ६ फेब्रुवारी २०१५ पासून आपल्या औरंगाबाद शाखेचे प्रबंधक श्री. धनंजय सहस्त्रबुद्धे व त्यांचे सहकारी संजय वालतुरे व अनिल कुलकर्णी यांच्या सहकार्याने जुना बाजार परिसरातील प्रत्यक्ष गॅस वितरण केंद्रावर बँक अकाऊंट सुरू करण्याच्या सुविधेस प्रारंभ केला. उघडण्यात आलेली खाती 'आधार' ला लिंक केली आहेत. त्यामुळे या खात्यांमध्ये गॅस सबसिडी जमा होऊ लागेल. सहस्त्रबुद्धे यांनी सांगितले की, लवकरच इतरही गॅस वितरण केंद्रांवर याप्रमाणे ग्राहक सुविधा सुरू होईल.

# Payment Banks

**Objectives**

The objective of setting Payment Banks in India is to further financial inclusion by providing small savings accounts and payments/remittance services to migrant labour force, low income house holds, unorganised sector entities and other similar users by enabling high volume – low value transactions in deposits and payment/ remittance services in a secured technology driven environment.

**Registration**

The payment Bank will be registered as a public limited company under Companies Act 2013 and licensed under section 22 of the Banking Regulation Act 1949, with specific licensing conditions restricting its activities to acceptance of demand deposits and provision of payments and remittance services. These banks will be governed by the provisions of the Banking Regulation Act 1949, Reserve Bank of India Act 1934, Foreign Exchange Management Act 1999, Payment and Settlement Act 2007, other relevant statutes and Directives, Prudential Regulations of RBI and other Regulators from time to time, including the regulations of SEBI.

**Eligibility**

Existing Pre-paid Payment Instruments issuers authorised under the Payment and Settlement System Act 2007, Non Banking Finance Companies, Corporate Business Correspondents, Mobile Telephone Companies, Supermarket chains, Companies, Real Sector Co-operatives and public sector entities are eligible to apply for Payment Bank license. Banks are permitted to take equity stake in a payment bank to the extent permitted under section 19(2) of the Banking Regulations Act 1949. The promoters of the payment bank should be fit and proper as in the eyes of the SEBI and the RBI on the basis of past record of sound credentials and integrity, financial soundness and successful track record of atleast past five years.

As these entities are set up for the differentiate objectives, they are permitted to undertake only following activities under the Banking Regulation Act 1949.

**Scope of Activities**

1) Acceptance of demand deposits, savings and the current deposits. These deposits are eligible for DICGC cover. Their primary role is to provide payments and remittances and demand deposits services to Small businesses and low income households. The payment banks initially are allowed to hold maximum deposit balance of Rs.1,00,000/- per customer, which may be enhanced after reviewing the performance of these Banks. If the, transactions in these accounts conform the small accounts transactions norms the RBI may permit simplified KYC/AML/CFT norms in these accounts.

> **'Hon'ble Finance Minister while presenting Union Budget 2014-15 on 10th July 2014 put forth his intentions to opt for small private banks to meet redit and remittances needs of small businessmen, Unorganised sector, Low Income house Holds, farmers, migrant work force and specifically to those who are under served in the population.'**

2) Offer payments and remittance services through their branches, business correspondents, mobile banking channels, Automated Teller Machines, Cash out of point of Sale Terminal locations.

3) Issue Prepaid Payment Instruments under Payment and Settlement Systems Act 2007.

4) Offer Internet Banking services to its customers after ensuring that the necessary enabling systems and risk management systems and controls are at place.

5) Can function as Business Correspondent of other banks to offer credit and other services to its Customers, which otherwise it cannot offer.

6) The bank should use the word 'Payments' in its name.

7) The payments Bank cannot set up subsidiaries to undertake non banking financial services to its clients.

8) The Payment Bank should strictly keep the other financial and non financial activities of the promoters, distinctly ring-fenced.

**Deployment of Funds**

The Payment banks are not allowed to undertake lending activities. Payment Banks need to invest their funds in Cash Reserve Ratio and Cash balance needed for running day to day activities and the balance amount should be invested in Government Securities/Treasury Bills with maturities upto one year. These banks are permitted to have access to the inter bank uncollaterized call money market and the collaterised CBLO Market for the purpose of temporary liquidity management.

**Capital Requirements**

Payment Banks do not encounter credit risk as they do not lend money. The investments are short term and held to maturity and therefore there is no need of capital for market risk. These banks are exposed to operational risk and to begin with are directed to hold minimum paid up voting equaty capital of Rs.100 Crores and a minimum capital adequacy ratio of 15 percent of its risk weighted assets on a continuous basis and a leverage ratio of not less than five percent i.e. the total outside liabilities should not exceed 20 times its net worth.

The minimum initial contribution of the promoters in the paid up voting equaty capital of the bank should be atleast 40 percent and locked in for minimum five years from the commencement of the business.

Excess initial holding by the promoters should be brought down to 40 percent within three years, to 30 percent within ten years and to 26 percent within twelve years after the commencement of the business.

The voting rights are capped up at ten percent, which may be raised to 26 percent in a phased manner by RBI. Any acquisition of five percent or more of paid up voting equity shares will require RBI approval.

**Business Plan**

As the concept of Payment Banks is floated for the purpose of providing banking facilities to remote and unserved areas, the preference will be given to those, who propose to set up Payment Banks with access points primarily in the under banked states/ districts in the North East, East and the Central regions of the Country.

Preference will be given to those who have a strong technological support to ensure cost saving wide spread network of access particularly to remote areas.

The Board of the Payment Bank should have a majority of independent directors and should comply with the corporate governance guidelines including fit and proper criteria for directors as issued by RBI from time to time.

**Other Conditions**

1. Entities other than the promoters will not be permitted to have share holding in excess of ten percent of the voting equity capital.
2. The bank is required to open atleast 25 percent branches in unbanked rural centres with population less than 9999.
3. The operations of the bank should be fully networked and technology driven from the beginning
4. The Bank should set up a high powered customer Grievance cell to handle customer complaints.
5. The Bank should comply all the stipulations of the RBI. Non compliance will lead to penal measures including cancellation of license.

# रत्नागिरी - शिवाजीनगर, शाखेमार्फत साजरा केला जागतिक महिला दिन-८ मार्च

जागतिक महिला दिनानिमित्त आपल्या रत्नागिरी – शिवाजीनगर शाखेमार्फत रत्नागिरी येथील महिला मंडळास शुभेच्छा देण्यात आल्या.

महिला मंडळामार्फत रत्नागिरी येथे महिला वसतीगृह, पाळणाघर, बालवाडी चालविण्यात येते.



# चिंचवडगांव शाखेतर्फे पर्यटन योजनेचे सादरीकरण




सुप्रीम हॉलीडेज या पर्यटन कंपनी तर्फे एक ट्रॅव्हल मेळावा आयोजित केला होता. कंपनीने आपल्या चिंचवडगांव शाखेस विनंती केली की आमच्या ग्राहकांसाठी एक पर्यटन कर्ज योजना करावी. त्यांच्या विनंतीनुसार शाखेने एक पर्यटन कर्ज योजना मुख्य कचेरी कर्ज विभागाकडून मंजूर करून घेतली.

या दोन दिवसांच्या मेळाव्यात त्यांच्या कंपनी व्यतिरिक्त अन्य कंपन्यांचे स्टॉल मांडण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन कंपनीचे मालक श्री. एल. व्ही. शिंदे यांनी केले. उद्घाटन प्रसंगी सर्व स्टॉल धारकांच्या मालकांनी आपापल्या प्रॉडक्ट्स बद्दल माहिती सांगितली. आपल्या कर्ज योजनांची माहिती शाखेतील अधिकारी श्री. अविनाश खेडकर यांनी सांगितली. या मेळाव्याला सुमारे ३०० पर्यटकांनी भेट दिली. कार्यक्रमाचे प्रमोशनसाठी ''क्लासमेट्स'' या मराठी सिनेमातील कलावंत सई ताम्हणकर, अंकुश चौधरी, सचेत पाटील, सोनाली कुलकर्णी, सुशांत शेलार, सुयश टिळक हजर होते.

या कार्यक्रमात विविध बक्षिसे लकी ड्रॉ कूपनद्वारे काढण्यात आली. १ले बक्षीस थायलंड टूर ४ रात्री ५ दिवस वास्तव्य – दोन व्यक्तिंकरिता असे होते. सदर बक्षीस शाखेतील सेवक श्री. विलास जिंदम यांना लागले आहे. कार्यक्रमात चिंचवडगाव शाखेचा सहभाग शाखेतील अधिकारी श्री. अविनाश खेडकर व शाखाव्यवस्थापक श्री. चंद्रशेखर प्रभुणे यांच्या प्रयत्नातून झाला.

## बँकिंग परिक्षांमधील यशाचे मानकरी

**अभिनंदन !**

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. दीपक बाळकृष्ण केळकर | कोअर बँकिंग | वरिष्ठ अधिकारी | Certificate in I.T. Security |
| श्री. अभिजीत अरुण जोशी | कोअर बँकिंग | कनिष्ठ अधिकारी | Certificate in I.T. Security |
| कु. सिद्धी शिवकुमार मोने | हिशोब | प्रोबे.लेखनिक | Diploma in Banking & Finance (DBF) |

## कोल्हापूर शाखेने आयोजित केला पुरोहित मेळावा




बँकेच्या कोल्हापूर शाखेने नुकताच पुरोहित मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात कोल्हापूर जिल्हा ब्राह्मण पुरोहित संघ यांचे सदस्य व त्यांचे कुटुंबीय यांना आमंत्रित केले होते. कार्यक्रमासाठी कोल्हापूर जिल्हा ब्राह्मण पुरोहित संघाचे श्री. अमोघ भागवत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच संघाचे अध्यक्ष श्री. प्रसाद निगुडकर हे सुद्धा उपस्थित होते. मुख्य कचेरीकडून नियोजन विभाग प्रमुख मा. श्री. राधाकृष्ण लिमये साहेब उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते श्री लक्ष्मी पुजनाने झाली त्यावेळी काही पुरोहित मंडळींनी लक्ष्मी अष्टक म्हटले. सी. आय. सी. डी. पुणे विभागातील अधिकारी श्री. उमेश उदगावकर यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. त्यानंतर मा. लिमये साहेबांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार झाला. श्री. लिमये साहेब व शाखाव्यवस्थापक श्री. दुनाखे साहेब यांनी प्रातिनिधिक स्वरूपात संघाच्या काही पुरोहितांचा सत्कार केला. त्यानंतर श्री. दुनाखे साहेब यांनी कार्यक्रम विषयक माहिती दिली व त्यानंतर मा. लिमये साहेब यांनी बँकेची सद्यस्थिती, बँक देत असलेल्या सुविधा याबाबत पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन द्वारे माहिती दिली.

## औरंगाबाद शाखेचा ५० वा वर्धापन दिन साजरा



दिनांक २७ फेब्रुवारी २०१५ रोजी औरंगाबाद शाखेने सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. शाखेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षातील पदार्पणाचा सोहळा शाखेमध्ये संपन्न झाला. शाखेच्या सुवर्ण महोत्सवाचा शुभारंभ, शाखेच्या स्थापनेपासून खाते असलेल्या खातेदाराचे शुभहस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आला.

या कार्यक्रमाला शाखेचे सर्वात जुने खातेदार असलेले, औरंगाबाद जिल्ह्यातील त्यावेळच्या जनसंघाचे माजी आमदार मा. रामभाऊ गावंडे, शाखेचे पहिले जागा मालक व पहिल्या स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य श्री. शशिकांतशेठ पारेख, सी.ए.श्री.पुरुषोत्तम मानधने, बँकेचे माजी संचालक श्री. हेमंतराव जोशी, श्री. बलरामजी येरमे, ज्येष्ठ पत्रकार श्री. अशोक उजळम्बकर, सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे सचिव श्री. रामकृष्ण जोशी, श्री. सुधाकरराव नेवपुरकर, विलास सेवलकर, श्री. रामराव जाधव, श्री. मामा ठाकूर, हे जुने खातेदार, ठेवीदार सौ. सविता गोंधळे, सध्याच्या स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य सौ. सविता कुलकर्णी, श्री. अजय शहा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत सह व्यवस्था प्रमुख श्री. धनंजयजी धामणे, विभाग कार्यवाह श्री. सर्जेराव जाधव, शहर कार्यवाह श्री. दिवाकर कुलकर्णी, शाखेचे पहिले सेवक श्री. बाबुराव निधोंकर, श्री. नरेंद्र तोडेवाले, श्री. मधुकर गायकवाड, श्री. महेश कुलकर्णी हे उपस्थित होते तसेच या कार्यक्रमाला शाखेच्या मान्यवर खातेदारांनी उपस्थित राहून शाखेच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## चिंचवडगाव शाखेमध्ये ग्राहक भेट कार्यक्रम संपन्न

चिंचवडगाव शाखेने एप्रिल २०१४ पासून दि. १२/०२/२०१५ पर्यंत महिंद्र कंपनीची; रु. २५ लाखाचे आतील सुमारे ३११ कर्ज प्रकरणे पूर्ण केली आहेत. दि. १२ फेब्रुवारी २०१५ रोजी ग्राहक भेट हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमासाठी महिंद्र कंपनीचे अधिकारी, कर्मचारी व आपल्या बँकेचे संचालक मा. श्री. किशोर भाई शहा उपस्थित होते. श्री. सुमीत वाघमारे यांचा मोठा सहभाग कार्यक्रमामध्ये होता. त्यांचा सत्कार श्री. किशोर भाई शहा यांच्या हस्ते करण्यात आला.

## औरंगाबाद शाखेचे जनसंपर्क-स्वच्छता अभियान यशस्वी




औरंगाबाद शाखेने दि. १ डिसेंबर २०१४ ते ३१ जानेवारी २०१५ या कालावधीसाठी जनसंपर्क अभियान आयोजित केले. अभियानाची सुरूवात स्वच्छता अभियानाने करून मा.पंतप्रधानांच्या स्वच्छता मोहिमेमध्ये सहभाग नोंदवण्यात आला.

त्यासाठी न्यू गुलमंडी रोड परिसराची स्वच्छता बँकेचे कर्मचारी वर्गाने केली.

औरंगाबाद (मध्य) चे आमदार मा. श्री. अतुल सावे व शाखा परिसरातील नगरसेवक श्री. अनिल मकरीये. तसेच सिडको भागातील नगरसेवक श्री. महेश माळवदकर यांनी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. कार्यक्रमास महानगरपालिकेचे वॉर्ड ऑफिसर श्री. जंजारे साहेब, आरोग्य निरीक्षक श्री. असदुल्ला खान तसेच काही खातेदारही उपस्थित होते.

हे अभियान औरंगाबाद शाखा व जालना रोड शाखा यांच्यातर्फे संयुक्तपणे घेण्यात आले दोन्हीही शाखेतील सर्व सेवक उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व सेवकांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांचे शाखा व्यवस्थापक श्री. सहस्त्रबुद्धे यांनी स्वागत केले व श्री. सोनुने यांनी आभार मानले.

सर्व स्तरातील जनतेपर्यंत बँक पोहचवून त्यांना बँकेच्या विविध ठेव, कर्जे व अन्य सेवांचे माध्यमातून बँकेशी जोडणे व स्थानिक बाजारपेठेतील बँकेचा सहभाग वाढविणे हा जनसंपर्क अभियानाचा उद्देश होता.

गरूड झेप

गरूड झेप ही गृहपत्रिका केवळ खाजगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही.
गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क करावा.
दूरध्वनी : ०२०-२४४५०५४०, मो. नं. ९९७०८००३४८. संपादकीय समन्वय : भालचंद्र कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी (मोबा. : ९८२२८८२५०९)